दै. पुढारी दि. 04/01/2022

# चोरीला गेलेले सोने, चांदीचे दागिने केले परत

## ग्रामीणचे ठाणेदार अशोक घोरबांड यांचा उपक्रम



**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** चोरीला गेलेल्या सोन्या, चांदीच्या वस्तू आणि रोख रक्कम परत मिळेल याची शाश्वतीच नसते. मात्र, ग्रामीण पोलिसांनी जबरी चोरी गुन्ह्यातील आरोपीकडून जप्त केलेल्या सर्व मौल्यवान वस्तू मूळ मालकाला परत देऊन सुखद धक्काच दिला. यावेळी गहिवरून आलेल्या मालकाला पोलिसांचे आभार मानताना भावना आवरणे शक्य झाले नाही. नवीन वर्षाच्या सुरुवातीला पोलिसांनी हा उपक्रम राबवून पुढील वर्षभरातील कामाची दिशाच स्पष्ट केली.

पोलिस आणि नागरिक यांच्यामधील दरी कमी व्हावी तसेच तक्रारीचा तातडीने निपटारा होऊन नागरिकांना न्याय मिळावा, या उद्देशातून ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार अशोक घोरबांड यांनी 'पोलिस आपल्या दारी, संरक्षण आमची जबाबदारी' हा उपक्रम राबवून नागरिकांमध्ये 'खाकी' विषयी आपुलकीची भावना निर्माण केली. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात व्यावसायिक रमेश दाचावार यांच्या सुनेला चाकूचा धाक दाखवून घरातील सुमारे २४ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लुटल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आत आरोपीच्या मुसक्या आवळून संपूर्ण मुद्देमाल मूळ मालकाला ठाणेदार घोरबांड यांनी परत केला होता. यामुळे त्यांची उपक्रमशील ठाणेदार अशी ओळख झाली. असाच एक उपक्रम नववर्षाच्या सुरुवातीला त्यांनी पूर्ण केला आहे.

माणिक मोरे हे सराफा व्यावसायिक १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास एका बॅगमध्ये सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम घेऊन दुचाकीवरून कौठा येथील राहत्या घरी आले होते. गेटजवळ उभे राहून डिक्कीतून बॅग काढत असताना त्यांच्यावर पाळत ठेवून असणाऱ्या दोघांनी त्यांना मारहाण करून बॅग हिसकावून पळ काढला होता. या प्रकारामुळे व्यावसायिकात दहशत पसरली होती.

पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलिस अधीक्षक नीलेश मोरे, पोलिस उपअधिक्षक डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ठाणेदार अशोक घोरबांड यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी आनंद बिचेवार, सपोनि आनंद दिघे यांच्या टीमने आरोपीला अटक करून त्यांच्याकडील सर्व मुद्देमाल जप्त केला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर डॉ. सिद्धेश्वर भोरे आणि अशोक घोरबांड यांनी मोरे यांना सन्मानाने मुद्देमाल परत केला. या उपक्रमाबद्दल पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी अशोक घोरबांड व टीमचे कौतुक केले.